साप्ताहिक

# दर्शक

E-mail : weeklydarshak.gmail.com R.N.I.NO.MAH/MAR/2000/02266

वर्ष ३६ अंक २ सोमवार २४ ऑगस्ट ते रविवार ३० ऑगस्ट २०२० किंमत रु.२

## शाळा सुरु करण्याबाबत लवकर निर्णय घ्या



लंडन,(वृत्तसंस्था) दि. २५ – करोनाचा धोका असताना सर्व लॉकडाऊन होते. मात्र,आता हा धोका कमी झाल्यामुळे मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवले जाऊ नये,त्यांच्या शाळा सुरु करण्याबाबत लवकरात लवकर निर्णय घेतला गेला पाहिजे, अशी मागणी ब्रिटनचे पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांनी केली आहे. करोनामुळे जाहीर करण्यात आलेल्या लॉकडाउनमुळे मुलांचे शिक्षण थांबले.आता परिस्थीती नियंत्रणात आली असून देशात करोनाचा धोका खूपच कमी झाला आहे. अत्यावश्यक सुरक्षा व काळजी घेत तसेच त्याबाबत आदेश देत आता शाळा सुरु करणे अत्यंत आवश्यक आहे. मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवणे हे करोनापेक्षाही जास्त घातक ठरेल, असे मतही त्यांनी व्यक्त केले. हिवाळ्यात शाळांचे दुसरे सत्र सुरु होते. सध्या पहिलेच सत्र पूर्ण झालेले नाही. त्यामुळे येत्या काही दिवसांत सर्व परिस्थितीचा आढावा घेत शाळांना करोनाबाबतच्या उपयांचे तंतोतंत पालन करणे बंधनकारक करत शाळा सुरु केल्या गेल्या पाहिजेत.स्कॉटलंड व आयर्लंडमधील शाळा या आठवड्यात सुरु करण्यात येणार असून इंग्लंड आणि वेल्समधील शाळा देखील सुरु केल्या जाव्यात, असेही त्यांनी सांगितले.मुलांना शिक्षणापासून तसेच शाळांपासून दूर ठेवल्यास त्यांच्या कौशल्यावर आणि अभ्यासावर वाईट परिणाम होऊ शकतो.शाळांमध्ये करोनाचा संसर्ग होण्याचा धोका खूपच कमी आहे. मुलांना शाळेत न पाठवल्याने निर्माण होणारा परिणाम हा करोना विषाणूच्या परिणामापेक्षा जास्त धोकादायक ठरेल, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली.करोनामुळे पाच महिन्यांपासून शाळा बंद आहेत.

## अहमदनगर शहरातील जीवघेणे खड्डे त्वरीत बुजवा : आ.संग्राम जगताप



अहमदनगर, दि.२५ –पावसामुळे शहरातील रस्त्यांची दुरावस्था झाली असून, अनेक षठकाणी खड्डे पडले आहे. त्यामुळे छोट्या मोठ्या अपघाताचे प्रमाण वाढले असून मनपाने तातडीने खड्डे बुजवण्याचे काम हाती घ्यावे असे, प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले. दिल्ली गेट नेप्ती रोड वरील गोगादेव मंदिरासमोरील जीवघेणा खड्डा चे सिमेंट काँग्रेसने बुजवण्याच्या कामाची पाहणी आ. जगताप यांनी केली. यावेळी वैभव वाघ, सुमित कुलकर्णी, विकी वाघ, राम वाघ व परिसरातील नागरिक उपस्थित होते. दिल्ली गेट ते नेप्ती रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. अशा वर्दळीच्या ठिकाणी पडलेल्या खंड्ड्यांची लवकरात लवकर डागडुजी करावी अशी मागणी आमदार संग्राम जगताप यांनी केली.

## निधीवरुन काही आमदार नाराज असल्याची थोरांताची कबुली



मुंबई, दि. २५ – काँग्रेसचे आमदार कैलास गोरंट्याल यांच्यासह ११ आमदार नगरविकास खात्याच्या निधी वाटपावरुन नाराज आहेत.यासंदर्भात आमदारांशी बोलून त्यांचं आम्ही समाधान करु, अशी प्रतिक्रिया महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी दिली. आमच्यासह मित्रपक्षांचे आमदार सुद्धा नाराज आहेत, त्यांचीही नाराजी आम्ही दूर करु, असे थोरात म्हणाले. काही आमदारांमध्ये नाराजी आहे. ती आम्ही बोलून घालवू. काही पक्षातील आमदारांना जास्त निधी मिळाला आहे. तर काहींना कमी मिळाला आहे, ही वस्तुस्थिती आहे. मात्र मी त्या पक्षाचं नाव घेणार नाही, असेही थोरातांनी सांगितले. राज्यात तीन पक्षांचे सरकार आहे. त्यामुळे सर्वांना समान संधी मिळाली पाहिले, ही अपेक्षा आहे. काही घटना घडल्या आहेत. ही वस्तुस्थिती आहे. त्यात सुधारणा करु, असे स्वत: मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगितले. यासंदर्भात आमदारांशी बोलून त्यांचं आम्ही समाधान करु. आम्ही सर्व नेते मुख्यमंत्र्यांशी बोललो, असे थोरात म्हणाले. आमदारांना मतदारसंघ सांभाळायचा आहे म्हणून ते लढत आहेत. आमच्या पक्षातील नाराजी आणि आघाडी सरकारचा काही संबंध नाही. मतदार संघाच्या प्रश्नांसाठी आमदार नाराज आहेत.आमच्यासह मित्र पक्षांचे आमदार सुद्धा नाराज आहेत, त्यांचीही नाराज आम्ही दूर करु, असेही ते म्हणाले.

## दिल्लीत केजरीवालांविरोधात भाजपला हवी हजारेंची मदत



अहमदनगर : ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांना आता थेट भाजपनेच पत्र पाठवले आहे. दिल्लीतील भ्रष्टाचार दूर करण्यासाठी भाजपच्या आंदोलनाला मदत करा, अशी हाक दिल्ली भाजपचे अध्यक्ष आदर्श गुप्ता यांनी हजारे यांना दिली आहे.गुप्ता यांनी पत्र पाठवत हजारे यांना आंदोलनात सहभागी होण्याचे साकडे घातले आहे. आदर्श गुप्ता यांनी पत्रात म्हटले, आहे की 'आम आदमी पक्ष'भ्रष्ट ाचारामध्य े सामील आह.े तमु ही दिल्लीत या आणि येथील लोकांना हे सांगा. तुमच्या नेतृत्वात आम आदमी पक्षाने भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठवला होता; मात्र आज हाच पक्ष भ्रष्टाचार करताना दिसत आह.े काही जणांनी बनावट कंपनी तयार करून 'आप'ला दोन कोटींची देणगी दिल्याचा आरापे करण्यात आला. आता त्यानं ा अटक केली आह.े याच काळात गुप्ता यांचे हे पत्र हजारे यांना आल े आह.े गुप्ता यांनी पत्रात लिहिले आह,े की आम्हाला आठवते की ५ एप्रिल २०११ रोजी तुम्ही दिल्लीच्या रामलीला मैदानावर भ्रष्टाचार निर्मुलनासाठी आणि जन लोकपाल विधेयकाची मागणी करून तत्कालीन सरकारविरूद्ध आमरण उपाषे ण सरूकेले होते. तुमच्या या आंदोलनामध्ये दिल्लीतील आणि दशे भरातील कोट्यावधी लोक सामील झाले होते; मात्र या आंदोलनानंतर तुमच्याच नावाने काही लोकांनी स्वच्छ राजकीय व्यवस्थेच्या नावाखाली निवडणुकीत उतरले. अरविंद केजरीवाल यांनी दिल्लीचे मुख्यमंत्री म्हणून आम आदमी पक्षाची राजकीय पक्ष म्हणून स्थापन केली आहे. ते मुख्यमंत्रीही आहेत. गुप्ता यांनी हजारे यांना लिहिलेल्या पत्रामध्ये अनेकांच्या नावाचा उल्लेख आहे.त्यांनी या पत्रामध्ये लिहिले आहे,की दिल्लीमध्ये आम आदमी पक्षाचे सरकार स्थापन झाले. यानंतर प्रशांत भूषण, योगेंद्र यादव, प्रा.आनंद कुमार, कुमार विश्वास यांचे खरे चेहरे लोकांसमोर आले आहेत. सोमनाथ भारती असो की संदीप कुमार, अमानतुल्ला खान किंवा जितेंद्र तोमर; या नावांची यादी लांबलचक आहे. खोटी आश्वासने, खोटे हेतू आणि जातीय राजकारणाच्या आधारे पुन्हा सत्तेत आल्यानंतर दिल्लीतील लोकांना 'आप'ने केलेल्या जातीय दंगलींचा सामना करावा लागत आहे. आता अण्णा तुम्ही पुन्हा दिल्लीमध्ये यावे आणि भ्रष्टाचार विरोधात आवाज उठवावा असे आवाहन केले आहे.

## पॉझिटिव्ह आहे की निगेटिव्ह असे सुरु आहे सत्र त्यामुळे लिहिले मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंना पत्र

अहमदनगरः जिल्ह्यातील कोरोना रुग्णांची संख्या १७ हजार ५८३ झाली असून. १३ हजार ९६४ रुग्ण आत्तापर्यंत बरे झाले आहेत. कोरोना चाचण्यांचा वेग वाढत असताना. कोरोना चाचण्यांचा सावळा गोंधळ सुरू आहे. महापालिका, खाजगी रुग्णालये पॉझिटिव्हचा रिपोर्ट देत आहेत. तर तोच रिपोर्ट जिल्हा रुग्णालयात निगेटिव्ह असल्याचे सांगितले जात आहे.पॉझिटिव्ह की निगेटिव्ह अशा चक्रव्यूहात सापडलेल्या काटवन खंडोबा मंदिरा जवळील महात्मा ज्योतिबा फुले वसाहतीतील एका कोरोना रुग्णाने मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पत्र लिहून या प्रश्नावर लक्ष वेधले आहे. महापालिकेने रॅपिड टेस्ट केल्यानंतर एका तरुणाचा अहवाल करोना पॉझिटिव्ह देण्यात आला परंतु या रुग्णालयात अहवालावर विशास बसत नाही म्हणून त्याने जिल्हा रुग्णालयात कोरोना स्टॅब दिला.जिल्हा रुग्णालयात टेस्ट केल्यानंतर त्याचा अहवाल करोना निगेटिव्ह देण्यात आला.त्यामुळे या तरुणाला मी पॉझिटिव्ह आहे की निगेटिव्ह, असा प्रश्न पडला मग त्याने मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पत्र लिहिले. मुख्यमंत्र्याकडे पाठवलेल्या पत्रात या २४ वर्षीय तरुणाने म्हटले आहे की, अहमदनगर शहर महानगर पालिकेतर्फे जी कोविड १९ अँटीजन (रॅपिड टेस्ट) तपासणी केली जाते,ही तपासणी खरंच कोविड सारख्या गंभीर महामारीचे निदान करते का? याबद्दल शंका आहे. मी २१ ऑगस्ट रोजी सायंकाळी भारतीय जैन संघटना, फोर्स मोटर्स, अहमदनगर महानगर पालिका, अहमदनगर जिल्हा प्रशासन, अहमदनगर जिल्हा रुग्णालय यांच्या वतीने आयोजित कोविड– १९ अँटीजन तपासणी उपक्रमांतर्गत जुने नगर जिल्हा रुग्णालय येथे तपासणी केली. तपासणीनंतर दहा मिनिटांतच मला कोविड १९ ची लागण झाल्याचे सांगण्यात आले. मी खूप घाबरून गेलो व टेन्शन आले. परंतु मला चाचणीची शंका आली. कारण, तिथे प्रत्येक व्यक्तीला पॉझिटिव्ह सांगत होते. मित्राशी चर्चा केल्यानंतर त्यानं मला सिव्हिल हॉस्पिटलमध्ये चाचणी करण्याचा सल्ला दिला. अजिबात विलंब न करता सिव्हिल हॉस्पिटलमध्ये गेलो व तिथे स्वॅब दिला. दोन दिवसांनी, २३ ऑगस्टला सिव्हिल हॉस्पिटलचा रिपोर्ट घेतला, त्यातमी निगेटिव्ह असल्याचे सांगण्यात आले.२४ ऑगस्टला मी पुन्हा रॅपिड टेस्ट केली,ती पुन्हा पॉझिटिव्ह आली आहे. त्यामुळे मी करोना पॉझिटिव्ह आहे की निगेटिव्ह ? असा प्रश्न मला पडला आहे.

### बोलते-दर्शक




## त्यांना माझे फोटो दिसत असतील,तर त्यांनी सत्ताधारी आमदारांचे फोटो देखील पहावे : खा.विखे



अहमदनगर : करोना रोखण्यासाठी मी जिल्हाभर फिरतोय. काही ठिकाणी बैठकाही घेतल्या. माझ्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात येत आहे. माझ्यावर गुन्हा दाखल करायचा असेल तर करा पण माझ्या एकट्यावरच नव्हे तर पारनेरमध्ये आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी कोविड सेंटरचं उदघाटन केलं. त्यांच्यासह या कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या ३०० लोकांवरही गुन्हे दाखल करा, अशी मागणी भाजपचे खा.डॉ. सुजय विखे-पाटील यांनी केली. एकट्या खासदाराला टार्गेट करण्यात काय अर्थ आहे?, असा सवालही त्यांनी केला.खा. सुजय विखे यांनी के.के.रेंज प्रश्नावर नगर, पारनेर,राहुरी तालुक्यातील गावांमध्ये जाऊन शेतकऱ्यांच्या बैठका घेतल्या आहेत. या बैठकीमध्ये सामाजिक आंतरपथ्य पाळले गेले नसल्याचे समोर आले आहे. तसेच बैठकीला असलेल्या अनेकांनी तोंडाला मास्क लावले नसल्याचेही फोटोमध्ये दिसून आले आहे. या बैठकीचे फोटो सोशल मीडियामध्ये व्हायरल झाल्यानंतर विखे यांच्यावर टीका सुरू झाली होती.मात्र या टीकेला उत्तर देताना विखे यांनी आरोग्यमंत्र्यांसह जिल्ह्यातील सत्ताधारी आमदारांवर देखील गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी केली आहे. ते आज जिल्हाधिकारी कार्यालयात एका बैठकीसाठी आले होते. त्यानंतर बोलत होते. जेव्हा मी टाळेबंदी लावा, असे म्हणत होतो तेव्हा तो लावला नाही. त्यामुळे मी माझ्या प्रवासाला सुरुवात केली,' असे सांगून विखे म्हणाले, 'माझ्या जिल्हाबंदीची मागणी काहीजणांनी केली. पण त्यांना माझे फोटो दिसत असतील,तर त्यांनी या जिल्ह्यातील सत्ताधारी आमदारांचे फोटो देखील पहावे. ते भूमिपूजन व उदघाटन कार्यक्रम घेताना दुप्पट गर्दी करीत आहेत. परंतु दुर्दैवाने सत्तेच्या विरोधात बोलण्याची कुणाची हिंमत होत नाही. मी जनतेच्या कामासाठी फिरतोय. माझ्यावर गुन्हा दाखल करायचा आहे, तर मी पूर्णपणे तयार आहे. मात्र फक्त माझ्या एकट्यावर हा गुन्हा नको. तर जे पारनेरमध्ये कोविड हॉस्पिटल उदघाटनाला आरोग्यमंत्री आले होते, त्यांच्यापासून त्या ठिकाणी अनेक नेते पदाधिकारी अधिकारी कर्मचारी सत्ताधारी नेतेमंडळी आणि पुढारी उपस्थित होते अशा सर्वांवरच गुन्हा दाखल व्हावा. कर्जतजामखेडमध्ये तर रोज भूमिपूजन होतात. त्यांच्यावर देखील गुन्हा दाखल व्हावा. केवळ एका खासदाराला सारख-सारख टार्गेट करून उपयोग नाही. त्यामुळे माझ्या एकट्यावर गुन्हा दाखल झाल्यास, या सर्वांवर ही गुन्हे दाखल करण्याची मागणी करणार, ' असे त्यांनी स्पष्ट केले.

## मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे

# तबलिगी विरोधात दाखल करण्यात आलेले गुन्हे तसेच दोषारोपपत्र रद्द करण्याचे आदेश



३५ तबलिगीविरोधात नगरमध्ये दाखल करण्यात आलेले गुन्हे तसेच दोषारोपपत्र रद्द करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्या. टी. व्ही. नलावडे आणि न्या. एम. जी. सेवलीकर यांनी दिले दिल्लीतील निझामुद्दीन मरकझ प्रकरणातील भारतीय तसेच विदेशी अशा ३५ तबलिगीविरोधात नगरमध्ये दाखल करण्यात आलेले गुन्हे तसेच दोषारोपपत्र रद्द करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्या. टी. व्ही. नलावडे आणि न्या. एम. जी. सेवलीकर यांनी दिले. परदेशातून न्या. एम. जी. सेवलीकर यांनी दिले. परदेशातून आलेल्या या नागरिकांनी व्हिसा कायद्यांचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन केलेले नाही, तसेच त्यांच्यावर दाखल करण्यात आलेले कोणतेही गुन्हे वस्तुस्थितीला धरून नसल्याचे मत नोंदवीत खंडपीठाने तब्लिगीं विरोधात केलेल्या अपप्रचाराबद्दल नाराजी व्यक्त केली. कोरोना रुग्णांची सध्याची संख्या लक्षात घेता कोरोना फैलावासाठी तबलिगीना जबाबदार धरून त्यांना बळीचा बकरा बनविण्यात आले, असेही खंडपीठाने म्हटले आहे.कोरोनामुळे राज्यात लॉकडाऊन काळात मशिदींमध्ये थांबलेल्या काही विदेशी आणि तसेच भारतीय तबलिगीविरोधात नगर जिल्ह्यातील जामखेड, नेवासा आणि नगर कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात येऊन अटक करण्यात आली होती. साथरोग प्रतिबंधक कायद्यांचा भंग याबरोबरच व्हिसा कायद्याचे उल्लंघन केल्याचा ठपका या तबलिगीविरोधात ठेवण्यात आला होता.परदेशी नागरिक भारतात आले तेव्हा त्यांची विमानतळावर तपासणी झाली होती. त्या वेळी त्यांच्यापैकी कोणीही कोरोनाग्रस्त नव्हता या प्रकरणाच्या सुनावणीअंती खंडपीठाने निकालपत्रात विविध निरीक्षणे नोंदविली. व्हिसा कायद्यात धार्मिक स्थानांना भेट देणे किंवा प्रवचनांना उपस्थित राहणे यावर कोणतेही बंधन नसल्याचे खंडपीठाने नमूद केले. हे परदेशी नागरिक भारतात आले तेव्हा त्यांची विमानतळावर तपासणी झाली होती. त्या वेळी त्यांच्यापैकी कोणीही कोरोनाग्रस्त नव्हता. उलट त्यानंतर देशभरात मोठ्या वेगाने कोरोना रुग्णांची संख्या वाढली. नगर जिल्ह्यात आल्यानंतर त्यांनी आपण येथे आल्याची माहिती पोलिसांना दिली होती. तसेच त्यांनी मशिदीत राहणे हे कोणत्याही प्रकारे बेकायदा नाही. त्यांनी कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी धर्मप्रचार केलेला नाही कारण त्यांना उर्दू वा हिंदी भाषा येतच नाहीत. असे खंडपीठाने स्पष्ट केले.तबलिगीमुळे देशभरात कोरोनाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात झाल्याचा अपप्रचार प्रिंट आणि इलेकट्रॉनिक प्रसारमाध्यमांनी तसेच सोशल मीडियातूनही करण्यात आला तबलिगीमुळे देशभरात कोरोनाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात झाल्याचा अपप्रचार प्रिंट आणि इलेकट्रॉनिक प्रसारमाध्यमांनी तसेच सोशल मीडियातूनही करण्यात आला. हा प्रकार अतिशय अनुचित होता, हे या प्रकरणातील तथ्य पाहता दिसून आल्याचे निरीक्षण खंडपीठाने नोंदविले. 'अतिथी देवो भव हि खरी भारतीय संस्कृती असताना पोलिसांनी दबावाखाली आणि सारासार विवेक बुद्धीचा वापर न करता या परदेशी नागरिकांविरोधात गुन्हे दाखल केले असल्याची निरीक्षणही यात नोंदविण्यात आले आहे. प्रकरणात याचिकाकर्त्यांतर्फे ॲड. शेख मजहर जहागीरदार आणि ॲड. ए. टी. ए.. के. शेख यांनी तर शासनातर्फे ॲड. एम. एम. नेर्लीकर यांनी काम पाहिले.

# जम्मू काश्मीरच्या विशेष दर्जासाठी संघटित प्रयत्न करावा

नवी दिल्ली, दि. २३ – जम्मू काश्मीरचा विशेष दर्जा पुन्हा दिला जावा या मागणीसाठी जम्मू काश्मीरमधील सहा पक्षांनी दृढपणे प्रयत्न करावेत, असे आवाहन कॉंग्रेसचे नेते पी. चिदंबरम यांनी केले आहे. जम्मू काश्मीरमधील राष्ट्रीय आणि प्रादेशिक अशा ६ पक्षांनी या अर्थाचा मागणी करणारा ठराव केला आहे. त्याचे चिदंबरम यांनी स्वागत केले आहे. राज्य घटनेतील कलम ३७० पुन्हा लागू केले जावे, यासाठी शनिवारी नॅशनल कॉन्फरन्स आणि पीडीपीसह ६ पक्षांनी मिळून हा ठराव केला आहे. त्यांच्या या प्रयत्नांना आपला सलाम असल्यचे चिदंबरम यांनी केलेल्या ट्विटमध्ये म्हटले आहे. 'जम्मू काश्मीरमध्ये आमच्या शिवाय काहीही केले जाऊ शकणार नाही. राज्यघटनेमधील कोणत्याही बदलाची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र सरकारला जम्मू काश्मीर मधील जनतेला विश्वासात घ्यावे लागेल.' अशा आशयाचे निवेदन या सहा राजकीय पक्षांनी प्रसिद्धीस दिले आहे. जम्मू काश्मीरचा विशेष दर्जा रद्द करण्याची कृती दूरदृष्टीच्या अभावाने केली गेली असून पूर्णपणे घटनाबाह्य आहे. गेल्या वर्षी ५ ऑगस्ट पूर्वीची स्थिती आणण्याचा निर्धारही या पक्षांनी व्यक्त केला आहे. या पक्षांनी आपला निर्धार कायम ठेवावा आणि दृढपणे आपल्या मागणीचा पाठपुरावा करावा,

# के. के. रेंज प्रश्नी खा. विखे न्यायालयात जाणार

नगर, दि.२३ (प्रतिनिधी) – के. के रेंज प्रश्नी शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी न्यायालयात जाणार आहे, अशी घोषणा नगरचे खासदार डॉ सुजय विखे यांनी रविवारी पारनेर तालुक्यातील ढवळपुरी येथे केली. दोन दिवसात बाधित २३ गावांतील शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहे, व नंतर अंतिम भूमिका मांडणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. १९८० पासून के.के. रेंज जमिनीचे आरक्षण पडले आहे, व आताही २०२६ पर्यत या आरक्षणाला मुदतवाढ दिली गेली आहे. पण आज पर्यंत राज्यातील कोणत्याही सरकारने हा प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न केले नाही. त्यामुळे मागील भाजप सरकार व तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना याबाबत जबाबदार ठरवणे चुकिचे आहे. खा. डॉ विखे म्हणाले, २३ बाधित गावातील किती शेतकऱ्यांचे किती क्षेत्र जाते, याची माहिती जिल्हा प्रशसनाकडेही नाही, बाधित क्षेत्राचा नकाशा कोणाकडे नाही, त्यामुळे किती नुकसान भरपाई मिळणार, याचेही सारे अंदाज चुकीचे आहेत. मागील २ महिन्यापासून या विषयाशी सर्व पत्र व्यवहार मी संकलित केले आहे. राज्य सरकारने केंद्र सरकारकडून घेतलेल्या लष्कराच्या जमिनीचा परतावा जमिनीच्या रूपातच द्यावा लागतो, हा कायदा आहे. पण १९८० पासूनच्या राज्य सरकारने तो पाळलेला नाही. त्यामुळे शतकऱ्यांना न्याय देण्यासाठी न्यायालयात जाणार व त्यांचा सर्व खर्च आपण स्वतः उचलणार, असेही विखे यांनी जाहीर केले. दरम्यान, बाधित २३ गावातील ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी के. के. रेंजमध्ये जाणार आहेत, आशा बाधित १० सर्वपक्षीय शेतकऱ्यांची समिती गावा गावा तुन करावी व या समितीने शेतकऱ्यांची म्हणणे संकलीत करून माझ्याकडे द्यावी, न्यायालयीन लढ्यासाठी ती उपयोगी ठरेल, असेही ते म्हणाले. बाधित गावातील कोणत्या शेतकऱ्याचे किती क्षेत्र जाणार आहे. याची माहिती आपण संकलित केली असल्याचे ही त्यांनी सांगितले. तसेच यादीतून नाव काढून देतो व जास्त नुकसान भरपाई मिळवून देतो, असे सांगणाऱ्या धंदेवाईक लोकांपासून लांब राहण्याचा सल्लाही त्यांनी दिला.




# सोनिया गांधी अध्यक्षपदाचा राजीनामा देणार



नवी दिल्ली, – कॉंग्रेसच्या हंगामी अध्यक्षा सोनिया गांधी यांनी अध्यक्ष पदावरून पायउतार होण्याचे संकेत दिले आहेत. पक्षाला पूर्णवेळ अध्यक्ष आवश्यक असल्याचे मत व्यक्त करणारे पत्र पक्षातील २० वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी गांधी यांना दिले आहे. या पत्रावर कपिल सिब्बल, शशि थरूर, गुलाम नबी आझाद, पृथ्वीराज चौहान, विवेक तानखा आणि आनंद शर्मा या वरिष्ठ नेत्यांनी स्वाक्षऱ्या केल्याआहेत. युवकांमधून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठिंबा वाढतो आहे.त्यामुळे पक्षाच्या नेतृत्वामध्ये निर्णायक बदल आवश्यक आहे,असे मत या पत्रामध्ये व्यक्त करण्यात आले आहे.पक्षाला पूर्णवेळ,दृश्य आणि सक्रिय अध्यक्ष मिळायला हवा, असे जरी या पत्रामध्ये म्हटले असले तरी राहुल गांधी यांच्या नेतृत्वावर त्यामध्ये काहीही टीका करण्यात आलेली नाही. सोनिया गांधी अथवा राहुल गांधी यांच्यापैकी कोणावरही आपण टीका करत नाही आहोत.पण पक्षाच्या व्यवस्थापनामध्ये आणि कार्यपद्धती मध्ये पूर्ण फेरबदल होणे आवश्यक आहे,असे पत्रावर स्वाक्षरी करणाऱ्यानेत्यांपैकी एकाने सांगितले. राहुल गांधी आणि सोनिया गांधी हेपक्षाचे अविभाज्य भाग राहतील,असेही या नेत्याने सांगितले.पक्षातील युवकांचा नेतृत्वावरील विश्वास उडत चालला आहे. कॉंग्रेस पक्षाला प्रामाणिक आत्मपरीक्षणाची गरजही असून सामूहिक नेतृत्वाची गरजही पत्रात व्यक्त करण्यात आली आहे. पक्षामध्ये काही ठळक सुधारणा होणे गरजेचे आहे. त्यात नेतृत्वाचे विकेंद्रीकरण, राज्यांमधील पक्षबांधणीचे सबलीकरण आणि प्रत्येक पातळीवर पक्षांतर्गत निवडणुकांची गरज आहे.

## आधार जोडणीनंतर ३ दिवसांत जीएसटी नोंदणी

नवी दिल्ली, दि. २४ – आधार क्रमांक जोडणाऱ्या उद्योगांना तीनच दिवसांत वस्तू आणि सेवा कराच्या नोंदणीला मंजुरी मिळेल, असे अप्रत्यक्ष कराच्या केंद्रीय मंडळाने म्हटले आहे. या संदर्भातील अधिसूचना २१ ऑगस्ट २०२० पासून लागू झाली आहे, असे 'सीबीआयसी'ने म्हटले आहे.जर व्यवसायाने आधार क्रमांक दिलेला नसेल तर व्यवसायाच्या जागेची प्रत्यक्ष पडताळणी केल्यानंतरच जीएसटी नोंदणी दिली जाईल, असे अधिसूचनेत असेही म्हटले आहे. नवीन करदात्यांच्या आधार प्रमाणीकरणासाठीच्या कृती प्रक्रियेला जीएसटी परिषदेच्या १४ मार्च २०२० रोजी झालेल्या ३९ व्या बैठकीमध्ये मंजुरी देण्यात आली आहे, असे अर्थ मंत्रालयाच्या सूत्रांनी सांगितले. मात्र या कृती प्रक्रियेची अंमलबजावणी कोविड-१९ मुळे लागू करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे लांबणीवर टाकण्यात आली होती. नवीन जीएसटी प्रमाणीकरणासाठी आधार प्रमाणीकरण करू इच्छिणाऱ्या व्यक्तीच्या अर्जाला उद्योगाचे ठिकाण, पूर्तता केलेल्या कागदपत्रांच्या प्रत्यक्ष पडताळणीनंतरच मंजुरी दिली जाईल. ही पडताळणी करण्यासाठी कामाचे २१ दिवस अथवा जर नोटीस जारी झाली तर त्याहून अधिक कालावधी लागू शकतो.असे सूत्रांनी सांगितले.आधार प्रमाणीकरणामुळे खऱ्या आणि प्रामाणिक करदात्यांची सोय होईल आणि त्याच वेळी बनावट आणि फसव्या संस्थांना जीएसटीपासून दूर ठेवले जाईल,अशी माहिती सूत्रांनी दिली.

# अन्यथा मुद्रांक विक्री परवाना रद्द करण्यात येईल : पाटील

अहमदनगर दि. २३– शेवगाव तालुक्यात रजिस्टर कार्यालयातील अधिकृत स्टॅम्प विक्रेत्याकडून होत असल्येल्या जनशक्ती विकास आघाडीच्या वतीने एस.एम एस आंदोलन करत सहा जिल्हा निबंधक वर्ग एक मुद्रांक जिल्हाधिकारी राजेंद्र पाटील यांना निवेदन दिले. या आंदोलनाची दखल घेत भविष्यात अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्यास मुद्रांक विक्री परवाना रद्द करण्यात येईल, असे पाटील यांनी सांगितले.संबंधित स्टॅम्प विक्रेत्याकडून गेल्या दीड ते दोन वर्षापासून कृत्रिम टंचाई करून शेतकऱ्यांना तसेच विद्यार्थ्यांची अडवणूक केली जाते. याबाबत तालुक्यातील सबरजिस्टर यांच्याकडे नागरिकांनी अनेकदा तक्रारी केली. मात्र याकडे त्यांनी दुर्लक्ष केले. याबाबत जनशक्ती विकास आघाडीच्या वतीने एस.एम. एस. आंदोलन करत मुद्रांक जिल्हाधिकारी राजेंद्र पाटील यांना निवेदन दिले. यावेळी अध्यक्ष ॲड. शिवाजी काकडे, जिल्हा परिषद सदस्य हर्षदा काकडे, जनशक्तीचे उपाध्यक्ष संजय आंधळे, संजय डोगरे, विष्णू दिवटे, योगेश देशमुख, लक्ष्मण पातकळ, गणेश दारुणकर,तुकाराम औटी, भागवत रासनकर आदी उपस्थित होते.




साप्ताहिक दर्शक
हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशन,संस्थापक संपादक शेख रियाजोद्दीन फजलोद्दीन यांनी दर्शकभवन,७२६,सरोष प्रिंटर्स,दिपाली थिएटर समोर,झेंडीगेट रोड,अहमदनगर ४१४००१ महाराष्ट्र येथे मुद्रीत करून येथेच प्रकाशित केले.बातम्यांची जबाबदारी कार्य.संपादक शेख आदिल रियाजोद्दीन यांच्यावर राहील मो.९७६३०३०३८६, ७६६६६०२६६० (अहमदनगर न्यायकक्षेत)

# जब मिल बैठेंगे तीन यार, सूनं,सासरे और सूर्यवंशम

खरंतर माझ्या माहेरची लोकं फारच अरसिक..सिनेमा, नाटकं, गाणी.. कसली म्हणजे कसलीच आवड नाही..त्यामुळे एखाद्या सिनेमातील इमोशनल सिन बघताना रडणं तर दूर पण साधं एक टिप्पूसही कोणाच्या डोळ्यात आलं तर शप्पथ ..मी त्यांच्या अगदीच विरूद्ध..अर्थात नॉर्मल.. इतरांसारखेच सिनेमा, गाणी, कॅरम, पत्ते यांसारखे शौक..आमच्या आवडी निवडी आणि स्वभावातील तफावत पाहता मला ह्यांनी लहानपणी खरच एखाद्या मंदिराच्या पायऱ्यांवरून उचलून आणलेले असावे असच कायम वाटायचं .. मग मोठेपणी ठरवलं की लग्नानंतर आपल्याला मिळणारं सासर तरी निदान थोडंफार..नाही नाही, बऱ्यापैकी रसिकच असाव..मग हिच 'इच्छा माझी पुरी करा' म्हणत पोह्यांचे कार्यक्रम उरकले.. म्हणजे, पोह्यांच्या कार्यक्रमात सासरच्यांना गाणी किंवा कोणते डायलॉग्ज वगैरे मारायला लावले नाहीत..पण एका कोपऱ्यात लाजत खुर्चीवर बसण्याऐवजी त्यांच्याशी थेट संवाद साधत, त्यांच्या आणि माझ्या आवडीनिवडी कितपत जुळतात हे जाणून घ्यायलाच मी उत्सुक असायचे..असो, तर अशा प्रकारे देवाच्या नव्हे तर स्वःतच्याच कृपेने मी असं रसिक सासर पदरात पाडलं..लग्न झाल्यावर सुरूवातीच्या तीन एक आठवड्यातच सासऱ्यांसोबत 'दोस्ती' चित्रपट पहाण्याचा योग आला..ब्लॅक ंड व्हाईट सिनेमा बघायची माझी चौथीच वेळ असावी... चित्रपट सुरूवाती पासूनच कमालीचा इमोशनल.. त्यात चाहूँगा मै तुझे सांज सवेरे गाणं लागताच मन भरून आलं..आता सासऱ्यांसमोर लगेचच आपल्या अश्रूंना पाय फुटायला नकोत म्हणून मी सोफ्यावरून एक पाय खाली ठेवत तिथून सटकणार तितक्यातच हा भला मोठा हुंदका..माझा नव्हे, सासऱ्यांचा.. माझ्याआधी त्यांच्याच अश्रूंनी उंबरठा ओलांडला होता..मी लगेचच रूमालाच्या शोधात लागले..तितक्यात सासू आतून टॉवेल घेऊन आली आणि म्हणाली रूमालाने नाही भागणार आज टॉवेलच लागणार (सासूला अशाच वेळेस बरोबर काव्य सुचतं).. एव्हाना माझ्या लक्षात आलेले की हे नेहमीचंच प्रकरण आहे..त्यांच रडणं बघून मला थोडंफार हसूही आलं.. थोडक्यात सांगायचं झालं तर मर्द को भी दर्द होता है हे कळालं आणि ते सांगताही येतं आणि दाखवताही येतं ह्यावर विश्र्वास बसला .. मग काय..त्यानंतर आम्हा दोघा ढवळ्या–पवळ्याची जोडी चांगलीच जमली.त्यांना गोडधोड खायला आवडतं मला बनवायला आवडतं..त्यांना पत्ते पिसायला आवडतात मला लोकांचे पत्ते कट करायला आवडतात..

त्यांना जुनी गाणी ऐकायला आवडतात मला ती म्हणायला आवडतात..त्यांना ग्लासभरून व्हिस्की आवडते तर मला ताटभरून चकना..बरं, आमच्या ह्या आवडी–निवडीच्या लिस्टला चार चांद लावायला अजून दोन गोष्टी आहेत.. पहिली म्हणजे कॅरम खेळताना आम्हा दोघांचाही राणीसाठी केला जाणारा आटापीटा..त्यांना कॅरम खेळताना बघून मला कायम मुन्नाभाईतल्या पारसी बावाचीच आठवण होते.. मग वाटतं एवढी चांदीसारखी बायको असताना (सासूचे सगळे केस पिकलेत त्यामुळे सोन्याऐवजी चांदीसारखीच म्हणावं लागेल) का बरं त्या राणीच्या पाठी पडायचं? तर दुसरी गोष्ट म्हणजे दोस्ती नंतरचे 'सूर्यवंशम' चित्रपटावर असलेले आम्हा दोघांचे अतोनात प्रेम .. लोकांनी ह्या चित्रपटाला कितीही नावं ठेवली तरी नाव काढलं बाप लेकाने असं म्हणत आम्ही दोघे हा विचित्रपट दरवेळेस बघतो..घरच्यांना मात्र आम्हा बापलेकाचे सूर्यवंशम वरचे प्रेम खटकतं.. हा सिनेमा लागणार म्हटल्यावर सगळ्यांच्या पोटात दुखायला लागतं..मग त्यावर तोडगा म्हणून आम्हाला हा विचित्रपट लागण्याआधी थोडीशी जय्यत तयारी करावी लागते –

जसं की सगळ्यात आधी कामवाली बाई, बिनबुलाए मेहमान किंवा नेमक्या ह्याच वेळेस गॉसिप नावाचा मसाला वाटायला दारात येणाऱ्या शेजारपाजारच्या बायका, अशांचा पत्ता कट करण्यासाठी दारावरची बेल बंद करून ठेवायची, लगेहात लँडलाईनचा रिसिव्हर बाजूला काढून ठेवायचा, त्यानंतर अहो जरा 'आम्ही सारे खवय्ये' लावा ओ अशी दर पाच मिनिटाला वाजणारी सासूची खरखर कॅसेट बंद करण्यासाठी तिच्या फोनवरून माझ्या तीनही विवाहीत नंदांना मिसकॉल मारायचा .. जेणे करून ताशी १ या हिशोबाने ३ तासांसाठी तीचापण पत्ता कट..

हे सगळं उरकल्यावर छान दोन पाण्याच्या बाटल्या .. हो पाण्याच्याच बाटल्या भरायच्या..एक सासऱ्यांसाठी दुसरी माझ्यासाठी, डोळे नाक पुसायला २ नॅपकिन्स आणि अधेमधे चरायला मिठी भात घ्यायचा (ज्यांनी सूर्यवंशम मन लाऊन बघितलाय त्यांनाच ह्या मिठी भाताची गोडी कळेल).. ह्या सगळ्या गोष्टींनी सोफ्यासमोरचा टेबल सजवायचा आणि मग टेबलाच्या दोन्हीबाजूंनी दोघांनी तंगड्या पसरवत एकदाचं सेटमॅक्स लावायचं.. मग त्याच त्याच प्रसंगांवर यथेच्छ रडायचं.. आणि सिनेमा संपला की टिव्ही बंद करून दोघांनी एकाच वेळी आणि एकाच सुरात म्हणायचं

आखिर हिरा(ठाकूर) है सदा के लिए

आज माझ्या ह्याच भानुप्रतापचा उर्फ सासऱ्यांचा ७० वा वाढदिवस ..आता ठाणे सोडून अमेरीकेत आले त्याला जवळजवळ अडीज वर्षे झाली ..अर्थात तो टेबल सजून, एकत्र सिनेमा बघत रडून आणि त्यानंतर एकमेकांची चेष्टा करूनही तितकीच वर्षे झाली.. आता मात्र ह्या कोरोनाने चांगलीच गोची करून ठेवली आहे ..

त्यामुळे आता फक्त वाट बघायची..
फिरसे वही मैफिल सजेगी..
जब मिल बैठेंगे तीन यार,
सून,सासरे और सूर्यवंशम

(लेखक : म्हाळसा)

# कौतूकाची थाप ही माणसाला फारे मोठी उर्जा देऊ शकते

शैक्षणिक क्षेत्रात अनेक सेमिनार्समध्ये विद्वानांची अनेक भाषणं ऐकण्याचा योग आला. बहुतांशी चर्चांमध्ये टिकेचा सूर होता. विषय कुठलाही असो. जेव्हा तो शेक्षणिक वर्तूळात चर्चिला जातो तेव्हा त्याच्या सर्व बाजू तपासल्या जातात. त्यामुळे एखाद्या मुद्द्याला लावून धरणारे जितके विद्वान असतात तितकेच त्यावर प्रखर टिका करणारेही आढळतात. माझे संशोधन व्यसनमुक्ती आणि स्वमदत गटांवर झाले आणि ते अजूनही संपले लेनाही. नवनविन गोष्टी उजेडात येत राहतात. अशा विषयांवर काम करीत असताना सकारात्मकतेचं महत्त्व लक्षात आलं. एखादा लेख, एखादी मुलाखत, एखादा प्रशंसेचा शब्द, एखादी पाठीवर पडलेली कौतूकाची थाप ही माणसाला फार मोठी उर्जा आणि सकारात्मक प्रेरणा देऊ शकते हे लक्षात आलं. त्यामुळे व्यसनमुक्ती आणि स्वमदतगट क्षेत्रात काम करीत असताना मी माझा दृष्टीकोण सेमिनारियन विद्वानांचा न ठेवता सर्वसामान्य माणसाचा, कौतुकाचा ठेवला. चांगलं दिसलं की त्याबद्दल लिहायचं ठरवलं. याचा मला फार उपयोग झाला. काल पार्किन्सन्स मित्रमंडळाच्या मासिक सभेत निलिमाताई बोरवणकर वक्त्या म्हणून आल्या होत्या. त्यांनी घेतलेल्या मुलाखतींवर आधारित त्यांचे व्याख्यान ऐकले आणि आपण योग्य मार्गावर चाललो आहोत याचे समाधान वाटले. निलिमाताईंनी असंख्य मुलाखती घेतल्या आहेत. त्यातील काही ठराविक मुलाखतींचे किस्से त्यांनी सांगितले. मूळातच त्या पार्किन्सन्स मित्रमंडळाच्या सभेत बोलत होत्या. वेळेआधीच आल्याने ही मंडळी एकमेकांशी कशी बोलतात, वागतात हे त्यांनी पाहिले आणि अचूकपणे तोच धागा पकडून पुढील भाषण केले.त्या म्हणाल्या एका आजाराबरोबर आपण जगत आहोत अशावेळी मनात नैराश्य येणे स्वाभाविक असते. मात्र अशीही माणसे जगात आहेत जी भयंकर समस्यांशी लढत असताना, परिपूर्ण आयुष्य जगतात आणि दुसर्यालाही मदतीचा हात देतात. त्यांनी सर्वप्रथम एका लावणी कार्यक्रमाची हकीकत सांगितली. त्यात प्रेक्षकांमध्ये बसलेल्या एका बाईंनी लावणीला अगदी शिट्टी वाजवून दिलखुलास दाद दिली होती. त्या बाईंच्या या मोकळ्या वागण्याने निलिमाताईंचे लक्ष त्यांच्याकडे वेधले गेले. माहिती काढली असता कळले की त्या बाईंचा मुलगा अपंग होता. पण हे दु:ख असतानाही त्या बाई सकारात्मक दृष्टीकोण ठेवून जगत होत्या. जगण्यातला आनंद उपभोगत होत्या. या छोट्याशा घटनेतून प्रेरणा घेऊन अशा तर्हेने दु:खात देखिल भरभरुन आयुष्य जगणार्यांच्या मुलाखती घेण्याची प्रेरणा त्यांना मिळाली. पुढे त्यांनी अशा एका कुटुंबाची मुलाखत घेतली ज्यांनी दत्तक घेतलेला मुलगा अपंग निघाला. संस्थेने ते मुल परत घेण्याची तयारी दर्शविली होती पण त्या आई म्हणाल्या जर हे माझं स्वतःचं मूल असतं तर मी परत केलं असतं का? आणि त्या दांपत्याने ते मुल वाढवलं. पुढे त्यांचे पती वारले त्यानंतर त्या आईंनी एकट्याने त्या मुलाला वाढवले. ही मुलाखत प्रसिद्ध झाल्यावर निलिमाताईंना एक फोन आला. त्या फोनवरुन कुणीतरी त्या आईंचा संपर्क मागत होतं. श्रावणात साडीचोळी देण्याची पद्धत आहे. त्या फोनवरील मंडळींना या आईंना साडीचोळी देण्याची इच्छा होती. दत्तक घेतलेल्या आणि नंतर अपंग निपजलेल्या मुलाला वाढवणार्या आईची मुलाखत एवढी प्रेरणा देऊन गेली. या मुलाखतीतील माहिती वाचून आचार्य अत्रे प्रतिष्ठानाचा आदर्श माता पुरस्कार या मुलाच्या आईला मिळाला. हे घडत असतानाच या आईंना साडीचोळी देणार्या कुटुंबाबद्दल निलिमाताईंना कुतुहल वाटत होते. माहिती काढली असता कळले की त्यांचा मुलगा मंगोल चाईल्ड होता. ही मुले मतीमंद असतात. त्यांची वाढ खुंटलेली असते. केस सरळ उभे असतात. समाजात अशांना चिडविणारे टवाळ असतातच. पण हे दांपत्य आपल्या मुलासाठी धडपडत होते. त्यांचीही मुलाखत निलिमाताईंनी घेतली. या मुलाचे नाव प्रथमेश. हा पुढे कंप्युटरवर टायपिंग शिकला आणि लायब्ररीत कामाला लागण्याईतकी त्याने प्रगती केली. नंतर निलिमाताईंना कुणीतरी फोन करून अशा मुलांना मिळणार्या राष्ट्रीय पुरस्काराची माहिती दिली. मुलाच्या आईवडिलांनी अर्ज भरला आणि भारत सरकारकडून सर्वोत्कृष्ट अपंग कर्मचारी या राष्ट्रपती पुरस्कारासाठी प्रथमेशची निवड झाली. हा पुरस्कार स्विकारण्यासाठी प्रथमेश आणि त्याचे आईवडीलच नव्हे तर त्यांच्या भागातील अनेक लोक स्वतःच्या पैशाने तिकिट काढून प्रथमेशचे कौतूक पाहण्यासाठी दिल्लीला गेले होते. येताना हे कुटूंब मुद्दाम पुण्याला उतरुन निलिमाताईंना भेटले. कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी. निलिमाताईंना धन्य धन्य वाटले. पुढे सोन्याला कस्तूरीचा घमघमाट सुटावा त्याप्रमाणे प्रथमेश या पुरस्कारानंतर आंतरराष्ट्रीय पारितोषिकासाठी पात्र ठरला आणि त्या पारितोषिकासाठी त्याची निवडही झाली. प्रथमेशच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तूरा खोचला गेला. हे सारे निलिमाताईंनी घेतलेल्या मुलाखतीमुळे झाले. त्या मुलाखतीपासून इतरांनी प्रेरणा घ्यावे असा भला उद्देश डोळ्यासमोर ठेवून पुढे या मुलाखतीचे अनेक भाषांमध्ये भाषांतरही झाले. पुढे प्रथमेशचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार झाला. प्रथमेश आणि त्यांचे कुटूंबिय आयुष्यात पहिल्यांदा विमानाने प्रवास करून आले. त्यावेळी गंमत म्हणजे विमानातल्या मासिकामध्ये प्रथमेशचे कौतूक छापून आले होते. पुढे या सुगंधी सोन्याचा सुरेख दागिना घडून त्याची परिपूर्ती झाल्याप्रमाणे प्रथमेशच्या विकाराशी संबंधित एक आंतरराष्ट्रीय कॉन्सफरन्स भारतात झाली आणि त्याचा ब्रँड ॲम्बॅसिडर म्हणून प्रथमेशची निवड झाली. निलिमाताईंच्या मुलाखती घेणे सुरुच होते. या प्रवासात आणखी एक वेगळे कुटूंब त्यांनी पाहिले. त्यातील दांपत्याला पहिला मुलगा होता आणि नंतर जुळ्या मुली झाल्या. त्यातील एक अपंग होती. मात्र हा मुलगा आपल्या दोन्ही बहिणींना खुप जपत असे. आईवडिलांना त्याची या मुलींना सांभाळण्यासाठी फर मदत होत असे. आयुष्य असे चालले असताना हा मोठा मुलगा परदेशी शिक्षणासाठी गेला आणि कॅन्सरने तेथेच त्याचे निधन झाले. हा दु:खाचा डोंगर कोसळला असताना त्या आईवडिलांनी त्यातून बाहेर येऊन अपंगांसाठी काम सुरु केले. शाळा काढली. त्यात अपंगांना निरनिराळी कौशल्यं शिकवून त्यांना रोजगार मिळावे यासाठी ही मंडळी प्रयत्नशील असतात. निलिमाताईंना एका अंध मुलाचाही असाच प्रेरणादायी अनुभव आला, त्याच्यासकट त्याची तिनही भावंडं अंधच निपजली. आणि त्या दु:खात वडिल गेले. आईने हिमतीने सर्वांना वाढवले.

निलिमाताईंनी ज्या अंध मुलाची मुलाखत घेतली तो रेडियो जॉकी आहे. त्याचे भरपूर वाचन आहे, तो स्वयंपाक करु शकतो. पैसा कमवतो आणि आता एका अंध मुलीशी तो लग्न करणार होता. त्याला फक्त पोळ्या करता येत नाहीत असे तो म्हणाला मात्र त्याच्या होणार्या पत्नीला पोळ्या करता येतात. त्याच्यातल्या सकारात्मकतेबद्दल निलिमाताई भरभरून बोलल्या. तो म्हणत होता आम्हाला देवाने डोळे दिले नसले तरी ती कमतरता इतर इंद्रिये तीक्ष्ण करून भरून काढली आहे. त्याला सर्वसामान्य डोळस माणसांपेक्षाही इतर इंद्रिये वापरून अनेक गोष्टी लगेच कळतात. निलिमाताई तर स्वतःच त्याच्याकडे त्याची मुलाखत घ्यायला जाणार होत्या पण हा इतका उत्साही की हाच त्यांच्या घरी आला. त्याला आपल्या अंधपणासाठी कुणाची दया नको होती. पुढे मस्क्युलर डिस्ट्रॅफी नावाचा आजार असलेल्या मुलाच्या पालकांची त्यांनी मुलाखत घेतली. ही मुले सर्वसामान्य मुलांसारखीच जन्मतात मात्र वयाच्या पाचव्या सहाव्या वर्षी या आजाराचे निदान होते. त्यानंतर काही वर्षांनी त्यांचे एकेक अवयव अशक्त होऊ लागतात आणि शेवटी ह्रदय बंद पडून या मुलांचा मृत्यु होतो. अगदी नॉर्मल असणारा आपला मुलगा हळुहळु अवयव निकामी होत शेवटी जाणार आहे हे हलाहल पालकांना पचवत जगावं लागतं. अशा एका मातेचे उद्गार निलिमाताईंनी आम्हाला संगितले. त्या आई म्हणाल्या माझा मुलगा फक्त सोळाच वर्ष माझ्या बरोबर होता पण तो इतका गुणी होता की त्याने माझ्या मातृत्वाला परिपूर्णता दिली. पूर्वी देव वर मागितल्यावर विचारायचे अल्पायुषी सद्गुणी मुलगा हवा कि दीर्घायुषी दुर्गुणी हवा? मला सद्गुणी मुलगा मिळाला. आईपणाचे समाधान त्याने दिले. मुलाच्या मृत्युकडे त्या बाई किती सकारात्मकपणे पाहात होत्या. या मुलाखतीनंतर निलिमाताई स्वतःच्याच उपचाराकरीता एका सुप्रसिद्ध डॉक्टरांकडे गेल्या असता त्यांना कळले की या डॉक्टरांकडे मस्क्युलर डिस्ट्रॉफीचे रुग्ण येतात. अशावेळी त्या आईवडिलांना तुमचा मुलगा बरा होणार नाही हे सांगणं डॉक्टरांना फार कठीण वाटत असे. या डॉक्टरांच्या वाचनात निलिमाताईंनी घेतलेली मुलाखत आली. आणि आता डॉक्टरांनी त्या मुलाखतींच्या काही प्रती काढून ठेवल्या आहेत. मस्क्युलर डिस्ट्रॉफीचे रुग्ण आले की ते त्यांना ही मुलाखत वाचायला देऊन त्यांच्या मनाची तयारी करून घेतात. निलिमाताईंकडून डॉक्टरांनी आपली फी घेतली नाही. असे असंख्य अनुभव निलिमाताईंच्या गाठीशी आहेत. निलिमाताईंनी अनेक मान्यवर आणि लोकप्रिय व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या. त्यात डॉ. जयंत नारळीकर, स्मिता तळवलकर, प्रशांत दामले,आरती अंकलिकर, विक्रम गायकवाड अशी सुप्रसिद्ध नावे आहेत. यातील अनेकांशी त्यांची मैत्री झाली आहे. यापैकी रंगभूषाकार विक्रम गायकवाड यांचा संघर्ष निलिमाताईंनी काही मिनिटात आमच्यासमोर उलगडला आणि त्यांच्या आयुष्याच्या सुरुवातीचे कष्ट समोर आले. त्याचप्रमाणे आपापल्या क्षेत्रात जागतिक स्तरावर प्रसिद्ध असलेल्या परंतु सर्वसामान्यांना माहित नसलेल्या साखरेची गोडी या विषयात तज्ञ असलेल्या वसुधा केसकर यांच्यासारख्या संशोधकाच्याही मुलाखती निलिमाताईंनी घेतल्या आहेत. मात्र आज बोलायचे होते ते पार्किन्सन्स मित्रमंडळातील सदस्यांबरोबर. त्यामुळे त्यांनी आपल्या बोलण्याचा रोख दु:खांवर मात करून जी मंडळी पुढे आली यावर जास्त ठेवला होता. व्याख्यानाची वेळ संपत आली होती आणि निलिमाताईंकडून किस्से कितीही ऐकावेसे वाटले तरी थांबणे भाग होते. शेवटी पुन्हा येण्याचे आश्र्वासन देऊन निलिमाताईंनी आपले व्याख्यान संपवले. संपवताना त्यांनी असे किस्से सांगताना आपल्यालाही कशी सकारात्मक उर्जा त्यातून मिळत गेली हे आवर्जून नमूद केले. पार्किन्सन्स मित्रमंडळातील सदस्यांचे आपापसात आपुलकिने भेटणे, या वयातही आधुनिक तंत्राशी मैत्री करून आजच्या लॉकडाऊनवर मात करून एकमेकांना ऑनलाईन भेटून आनंद मिळवणे या वृत्तीची त्यांनी प्रशंसा केली. निलिमाताईंचे व्यक्तीमत्व कुणालाही त्यांच्याशी चटकन मैत्री कराविशी वाटेल असेच आहे. त्यांचा स्वभाव बोलका आहे. आपल्या येण्याने, असण्याने वातावरणात चैतन्य आणणार्या काही व्यक्ती असतात. मला त्या अशा वाटल्या. त्यांनी बोलताना नम्रतेची पराकाष्ठा केली. त्यांच्या मुलाखतींचा इतरांच्या आयुष्यावर इतका परिणाम झाला पण त्या मात्र त्याचे फारसे श्रेय घ्यायला तयार नाहीत.

इतक्या मुलाखतींनंतरही आणखी अशा अनेक माणसांना भेटण्याची त्यांची ओढ मला महत्त्वाची वाटली. कालच्या त्यांच्या व्याख्यानामुळे आपल्या दु:खाचे आपण जरा जास्तच कोडकौतुक करत असतो याची मला तरी पुन्हा एकदा नव्याने जाणीव झाली. आपले दु:ख क्षुद्र वाटावे अशी झंझावाताप्रमाणे आयुष्य उलथून टाकणारी दु;खं पचवून माणसे नुसती उभीच राहात नाहीत तर दुसर्यांसाठी मदतीचा हातही पुढे करतात हे पाहिले. खरंच त्यासाठी निलिमाताईंसारख्या सकारात्मकतेची पेरणी करून उर्जा देणार्या माणसांचे मला फार आभार मानावेसे वाटतात.

(लेखक : अतुल ठाकुर)

# आयुर्वेद कॉलेजमधून हजारो विद्यार्थ्यांची वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून समाजाची सेवा करत आहे

## आ.संग्राम जगताप

अहमदनगर : आयुर्वेद कॉलेजला ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. शंभर वर्षाच्या कारकिर्दीत आयुर्वेद कॉलेजमधून हजारो विद्यार्थ्यांची वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून समाजाची सेवा करत आहे शेतकऱ्यांच्या



मुलांची व सर्वसाधारण सामान्य कुटुंबातील मुलांचं डॉक्टर होण्याचे स्वप्न पूर्ण करण्याचे काम आयुर्वेदिक महाविद्यालय करत आहे. सकारात्मक दृष्टिकोन ठेवून समाजामध्ये काम करणे गरजेचे आहे. नगर शहरातील जनतेला माणुसकीचा वारसा लाभलेला आहे. यापुढील पिढीने सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून माणुसकीचा ठेवा जोपासावा. क्रीडाई अहमदनगर संस्थेने नेहमीच सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून काम केले आहे. त्यांचा आदर्श इतर सामाजिक संस्थांनी घेऊन काम करावे. त्यांनी आज आयुर्वेद कॉलेजला ईसीजीची मशीन भेट देऊन एक प्रकारे सामाजिक बांधिलकी जोपासली आहे असे प्रतिपादन नगर शहराचे आमदार संग्राम जगताप यांनी केले.आयुर्वेदिक गुणे महाविद्यालयाला क्रीडाई संस्थेच्यावतीने ईसीजी मशीन ची भेट आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते देण्यात आली.यावेळी क्रीडाई संस्थेचे अध्यक्ष नितीन गुगळे नरेंद्र बाफना, उपाध्यक्ष अमित मुथा, राहुल लुनीय, रसिक लुनिया, प्राचार्य डॉ. प्राणिला नलगे –दिवटे, डॉ. समीर होळकर, वैभव ढाकणे, संतोष ढाकणे, प्रशांत धलपे. नरेंद्र बाफना म्हणाले की क्रीडा संस्थेच्या माध्यमातून वर्षभर सामाजिक बांधिलकी जोपासले आहे.आ. जगताप यांनी शहरामध्ये विकास कामाबरोबर सामाजिक बांधिलकीतून काम केले आहे. त्या कोरोना सारख्या महामारीच्या काळात पण आमदार संग्राम जगताप यांनी अनेकांना धीर व आधार दिला सर्वसामान्य कुटुंबांना अन्नधान्य तसेच किराणा सारख्या अत्यावश्यक अशा गरजू वस्तूंचे अहमदनगर शहरातील विविध भागात पुर्णतः जबाबदारीने वाटप करून लोकांची मदत करून एक प्रकारे कर्तव्यदक्ष लोकप्रतिनिधीचे काम त्यांनी पूर्ण केले.




कहाँ आँसुओं की ये सौग़ात होगी
नए लोग होंगे नई बात होगी
मैं हर हाल में मुस्कुराता रहूँगा
तुम्हारी मोहब्बत अगर साथ होगी
बशीर बद्र

# कोरोना बाधितांना मिळणार मुबलक ऑक्सिजन



अहमदनगर । शहरात कोरोना बाधितांची संख्या वाढत आहे. कोरोना बाधित रुग्णांना मोठ्याप्रमाणात ऑक्सिजनची गरज पडत आहे. हे ओळखून आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रशिक्षक पवन गांधी यांच्या प्रयत्नातून मुंबईच्या अथर्व ग्रीन एकोटेक कंपनी व मानवी व्हॅल्यूच्या आंतरराष्ट्रीय असोसिएशनच्या सहकार्याने अहमदनगर–च्या जिल्हा रुग्णालयाच्या कोविड सेंटर मधील करोना बाधितांच्या उपचारासाठी १० अत्याधुनीक हायफ्लो ऑक्सिजन मशीन देण्यात आले आहेत. जिल्हारुग्णालयात रुग्णालयाचे वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. सुनील पोखरणा यांच्या कडे पवन गांधी यांनी हे सर्व मशीन सुपूर्द केले. यावेळी आर्ट ऑफ लिव्हिंगचे सदस्य अॅड.अनंत फिरोदिया, गायक भूषण मालू, योगेश बजाज आदि उपस्थित होते.यावेळी बोलतांना पवन गांधी म्हणाले,नगर मध्ये कोरोना बाधितांची संख्या वाढत आहे. अनेक कोरोना रुग्णांचा ऑक्सिजन कमी झाल्याने मृत्यू झाला आहे. परिस्थिती नियंत्रणात रहावी यासाठी जिल्हाधिकारी राहुल द्वीवेदी यांच्या संकल्पनेतून जिल्हारूग्णालयासाठी तातडीने अत्याधुनिक हायफ्लो ऑक्सिजन मशीनची मागणी आर्ट ऑफ लिव्हिंगच्या मानवी व्हॅल्यूच्या आंतरराष्ट्रीय असोसिएशनकडे करण्यात आली. त्यानुसार अथर्व ग्रीन एकोटेक कंपनीच्या सहकार्याने जिल्हारुग्णालयाला अल्पावधीत हे १० अत्याधुनीक हायफ्लो ऑक्सिजन मशीन मोफत मिळाल्या आहेत. यासाठी मुंबईचे रमेश रमण व उद्योजक चंद्रकांत राठी यांचे बहुमोल सहकार्य लाभले. हे अत्यधुनिक मशीन उपलब्ध झाल्याने या पुढील काळात कोरोना बाधितांचा ऑक्सिजन अभावी मूत्यू होणार नाही.जिल्हाधिकारी राहुल द्विवेदी हे चांगले काम करत असल्याने त्यांना आर्ट ऑफ लिव्हिंगचे सहकार्य मिळाले आहे.आर्ट ऑफ लिव्हिंग, अथर्व ग्रीन एकोटेक व मानवी व्हॅल्यूच्या आंतरराष्ट्रीय असोसिएशनच्या सहकार्याने जिल्हा रुग्णालयाला मिळालेल्या मदतीबद्दल वैद्यकीय अधिकारी डॉ.सोनील पोखरणा यांनी सर्वांचे आभार मानले.

## कोरोना उपाययोजनेसाठी महापालिकेला हवेत १० कोटी

अहमदनगर । कोविड उपचार केंद्रासाठी महापालिकेला पैशांची गरज पडू लागली असून, यासाठी दहा कोटी रुपये देण्याची मागणी महापौर बाबासाहेब वाकळे व भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष नगरसेवक महेंद्र गंधे यांनी जिल्हाधिकारी राहुल द्विवेदी यांच्याकडे केली आहे. जिल्हाधिकारी द्विवेदी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, की अहमदनगर शहरात कोरोनाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढत आहे.कोरोना झालेल्या रुग्णांची संख्या पाहता उपाचाराची सुविधा वाढविणे गरजेचे आहे. महापालिकेतर्फे रुग्णांच्या उपचारासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत. महापालिकेने शहरात तीन कोविड उपचार केंद्र सुरु केलेले आहेत. मात्र वाढते रुग्ण पाहता आणखी कोविड सेंटर सुरू करण्याची आवश्यकता आहे. महापालिकेचे आर्थिक स्त्रोत सध्या बंद आहेत.शासनाकडून कोविड रुग्णांच्या उपचारासाठी निधी प्राप्त झालेला आहे. त्यामधून महापालिकेस दहा कोटींचा निधी उपलब्ध करून द्यावा,अशी मागणी वाकळे व गंधे यांनी केली आहे.

# कोरोना बाधिताची तिसऱ्या मजल्यावरुन आत्महत्या




अहमदनगर । शहरातील गुलमोहर रोडवरील सुरभी हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असलेल्या एका कोरोना बाधित रुग्णाने हॉस्पिटलच्या तिसऱ्या मजल्यावरुन उडी मारून आत्महत्या केली. ही धक्कादायक घटना मंगळवारी पहाटे साडेतीनच्या समुरास घडली. घटनेमुळे अहमदनगर शहरासह जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.दरम्यान, दुपारी उशीरापर्यंत तोफखाना पोलिस ठाण्यात याबाबत तक्रार दाखल नव्हती. अहमदनगर शहरासह जिल्ह्यात कोरोनाने धुमाकूळ घातला असून जिल्ह्यातील कोरोना बाधितांची संख्या १७ हजारांच्या पुढे गेली आहे. कोरोना बाधित रुग्ण वाढल्याने हॉस्पिटलमध्ये बेड मिळणे अवघड झाले आहे. त्यातच मंगळवारी पहाटे अहमदनगर शहरातील सुरभी हॉस्पिटलमध्ये कोरोना बाधित रुग्णाने तिसऱ्या मजल्यावरुन उडी मारुन आत्महत्या केली. उडी मारल्यामुळे रुग्णाला जबर मार लागला होता. त्यावर उपचार सुरू असतानाच मंगळवारी दुपारच्यावेळी त्याची प्रामज्योत मावळली. ३२ वर्षीय हा रुग्ण पाथर्डी तालुक्यातील आहे. त्याच्यावर मागील दहा दिवसांपासून शिरूर येथील खासगी हॉस्पिटलमध्ये उपचार सुरु होते. सोमवार रात्री तो सुरभी हॉस्पिटलमध्ये उपचार घेण्यासाठी दाखल झाला होता. पहाटे सव्वा तीन ते साडेतीन वाजेच्या सुमारास त्याने हॉस्पिटलची काच तोडून थेट तिसऱ्या मजल्यावरुन खाली उडी मारली. ही घटना निदर्शनास येताच हॉस्पिटमधील डॉक्टर व कर्मचाऱ्यांनी तात्काळ त्याच्यावर उपचार सुरु केले, मात्र त्यात त्यांना यश आले नाही. कोरोना बाधित रुग्णाने आत्महत्या केल्याच्या प्रकाराने नगर शहरासह जिल्ह्यात खळबळ उडाली आह




PARADISE
ART & DISPLAY
Auth.Distributors
ALKOSIGN WRITING & DISPLAY SYSTEMS
* WHITE BOARD
* PERFORATED BOARD
* ACRYLIC WORK
* NAME PLATES
HAJI IDREES SHAFI SHAIKH
9890524092 / 9028718302
1406-7,Mominpura,Sangamner,
Dist : Ahmednagar


साप्ताहिक दर्शक
e-mail - weeklydarshak@gmail.com

IF UNDELIVERED PLEASE RETURN TO
DARSHAK
DARSHAK BHAVAN,
726,OPP.DEPALI
THEATER ZENDIGATE,
AHMEDNAGAR-414001
MAHARASHTRA

R.N.I. NO.
MAH/MAR/2000/02266
POSTAL REGD.NO.
ANR/068/2018-2020

TO,